**प्रेसनोट** दि. 24/11/2025

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून मालोजी राजे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इंदापूर येथील लिपीक विरोधात लाचमागणी व स्विकारलेप्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे घटक** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | इंदापूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | पुरुष, वय 43 वर्ष |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | अनमोल शिवाजी शिंगे, वय 53 वर्षे, प्रमुख लिपिक, मालोजी राजे औद्योगिक प्रशिक्षण संस्था इंदापूर जिल्हा,पुणे. रा.दुसरा माळा,तापी गृहनिर्माण संस्था, राजवेली नगर इंदापूर जिल्हा पुणे, (वर्ग :- 3) |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | 3,000/- (तीन हजार रूपये फक्त) |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | 2,000/- (दोन हजार रूपये फक्त) |
| **पडताळणी दिनांक** | दि. 19/11/2025 |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | 2,000/- (दोन हजार रूपये) |
| **सापळा दिनांक** | दि. 24/11/2025 |
| **ठिकाण** | मालोजीराजे औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यालय, इंदापूर, जि. पुणे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. अविनाश घरबुडे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9860667770) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. सुहास हट्टेकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र.9881873330) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे मालोजीराजे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इंदापूर येथे वसतीगृह अधीक्षक म्हणून नोकरीस आहेत. आरोपी लोकसेवक हे त्याच प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रमुख लिपिक म्हणून काम करीत आहेत. तक्रारदाराचे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर 2025 या तीन महिन्याचे थकीत वेतन काढून दिल्याचा मोबदला म्हणून यातील आरोपी लोकसेवक हे तक्रारदाराकडे तीन हजार रुपये लाचेची वारंवार मागणी करून लाच न दिल्यास पुढील कार्यालयीन कामकाजामध्ये अडथळे निर्माण करण्याची धमकी देत असल्याची तक्रार तक्रारदार यांनी 19/11/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दिली होती.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. 19/11/2025 रोजी मालोजीराजे औद्योगिक प्रशिक्षण संस्था इंदापूर येथील कार्यालयात पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक अनमोल शिवाजी शिंगे यांनी तक्रारदारांचे थकीत वेतन काढून दिल्याचा मोबदला म्हणून तसेच इथून पुढे सहकार्य करण्यासाठी म्हणून 2,000 रुपयाची लाच मागणी करून लाच स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याचे निष्पन्न झाले.

आज दि. 24/11/25 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी लोकसेवक प्रमुख लिपिक अनमोल शिंगे यांनी तक्रारदाराकडून 2000 रुपयाची लाच मालोजीराजे औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यालय इंदापूर पुणे येथे 14:48 वा. पंचासमक्ष स्वीकारली असता रंगेहाथ पकडण्यात आले आहे. त्यांच्याविरुद्ध इंदापूर पोलीस स्टेशन ठाणे, पुणे ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक** - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.